—: प्रेस नोट :—

दिनांक : २१.०६.२०२३

| | |
|---|---|
| घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.रूपेश प्रतापसिंग ठाकुर, वय ३३ वर्षे, पद —वरिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती **रा.नर्सरी, ता.अचलपुर जि. अमरावती वर्ग—३.** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रूपये |
| पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती मागणी केलेली लाचेची रक्कम | १३,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १३,०००/— रूपये |
| घटनास्थळ | कक्ष क्र.४ माध्यामीक विभाग, शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | दि.२१/०६/२०२३ चे अंदाजे १४.०९ वा. ते १४.२८ वा.दरम्यान |

**थोडक्यात माहिती :—** यातील तक्रारदार तक्रारदार यांच्या वडीलांचे वैदयकीय प्रतीपुर्तीचे बिल ३,३७,९१८/— रूपये मा.शिक्षणाधिकारी माध्यमीक जि.प.वाशिम यांचे कडे सादर केलेले बिल २ लाख रू. पेक्षा अधिक असल्याने सदर देयक मंजुर करण्याचे अधिकार मा.शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना असल्याने मा.शिक्षण उपसंचालक अमरावती येथे पाठविले असुन सदर बिल मंजुर करुन देण्यासाठी वरिष्ठ लिपीक श्री.रूपेश ठाकुर हे १५,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी सविस्तर तक्रार दिली होती.

**सदर तक्रारीवरुन** दिनांक २१/०६/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांच्या वडीलांचे वैदयकीय प्रतीपुर्तीचे बिल मंजुर करून देण्यासाठी यातील लोकसेवक श्री.रूपेश प्रतापसिंग ठाकुर यांनी तडजोडीअंती १३,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले व लगेच आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.रूपेश प्रतापसिंग ठाकुर यांनी तक्रारदार यांचेकडून १३,०००/— रूपये लाचेची रक्कम त्यांचे कक्ष क्र.४ माध्यामीक विभाग येथे स्विकारल्याने लोकसेवक श्री. रूपेश ठाकुर यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले. तसेच त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सिटी कोतवाली अमरावती शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.मारूती जगताप सा., अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.देविदास घेवारे सा., घटक प्रमुख श्री. शिवलाल भगत सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री.योगेशकुमार दंदे, व पोलीस निरिक्षक श्री.अमोल कडु, पो.कर्मचारी पोहेकॉ. नंदकिशोर गुल्हाने, श्री.शैलेश कडु, आशिष जांभोळे, व चालक पोउपनि सतिष किटुकले, पोहेकॉ.चंद्रकांत जनबंधु सर्व ला.प्र.वि.अमरावती यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच.मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :—** अँन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, पराजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी कमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५९.

**( योगेशकुमार दंदे )**
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती.